**प्रसिध्दी पत्रक** दिनांक २१/०६/२०२४

**आरोपी लोकसेवक-** 1) श्री. सॅमसन छबुराव कसबे, वय 49 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- स्वच्छता निरीक्षक, (वर्ग-3)महानगरपालीका जालना यांनी तक्रारदार यांच्याकडून रुपये 5000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस टाणे | :- | पोलीस स्टेशन सदर बाजार जालना जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्री. सॅमसन छबुराव कसबे, वय 49 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- स्वच्छता निरीक्षक, (वर्ग-3) महानगरपालीका जालना. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 5000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. दिलीप साबळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| सहाय्यक अधिकारी | :- | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी अनाधिकृत बांधकाम केलेले होते दिलेली नोटीस रद्द करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांनी महानगरपालिका जालना यांची परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केल्याबाबत त्यांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 कलम 53 (1) अन्वये बजावणी करण्यात आली होती सदरची नोटीस रद्द करण्यासाठी आ.लो.से. सॅमसन कसबे यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 20/06/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आ.लो.से. सॅमसन कसबे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 5000/-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन लगेच स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे दि.21/06/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. सॅमसन कसबे यांनी 5000/- रुपये लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह आ.लो.से. सॅमसन कसबे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तक्रारदार यांचे फिर्यादवरुन पोलीस स्टेशन सदर बाजार जालना जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक दिलीप साबळे, सहाय्यक अधिकारी पोलीस निरीक्षक केशव दिंडे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार भिमराज जिवडे, रवि काळे, अशोक नागरगोजे चालक सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 8668752530

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.